**ह्या पॉलिसीमध्ये, गुंतवणूक पोर्टफोलिओमधील गुंतवणूकीची जोखीम पॉलिसीधारकाची असते.**

**''युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्रॉडक्ट्स हे कराराच्या पहिल्या पाच वर्षांमध्ये कोणतीही रोखीकरण सुलभता देऊ करत नाहीत. पॉलिसीधारक पाचव्या वर्षाच्या अखेरीपर्यंत युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्रॉडक्ट्स मध्ये गुंतवलेले पैसे पूर्णपणे वा अंशत: सरेंडर करू वा काढू शकत नाहीत.''**

## एसबीआय लाइफ - स्मार्ट इन्शुअरवेल्थ प्लस का?

जीवनात तुम्ही जसजसे पुढे जाता, तुमची स्वप्ने तुमच्या सोबत वाढत जातात. तुमच्या कुटुंबाच्या आर्थिक भावी काळाला सशक्त बनवताना, तुमच्या आकांक्षांचीही पूर्तता करा, एसबीआय लाइफ – स्मार्ट इन्शुअरवेल्थ प्लसच्या सहाय्याने. हा युलिप प्लॅन तुमच्या जीवलगांना सुरक्षा देतानाच, तुमच्या संपत्तीची उभारणी करतो. एसबीआय लाइफ – स्मार्ट इन्शुअरवेल्थ प्लस हे एक इंडिविज्युअल, युनिट–लिंक्ड, नॉन–पार्टिसिपेटिंग, लाइफ इन्शुरन्स उत्पादन आहे, जे तुम्हाला तुमच्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी शिस्तशीर बचतीच्या वैशिष्ट्यासह आयुर्विमाछत्र तसेच **पद्धतशीर मासिक रक्कम काढण्याच्या**# सुविधेसाठी लवचिकता देतो.

## ठळक वैशिष्ट्ये

- **इझी मंथली इन्शुरन्स** : निवडलेल्या कालावधीमध्ये मासिक प्रीमियम भरून गुंतवणुकीत शिस्तीचा अंतर्भाव
- **3 गुंतवणूक स्ट्रॅटेजींमधून निवडीसाठी वाव :** ट्रिगर स्ट्रॅटेजी, ऑटो ॲसेट ॲलोकेशन स्ट्रॅटेजी आणि स्मार्ट चॉईस स्ट्रॅटेजी
- **स्मार्ट चॉइस स्ट्रॅटेजी अंतर्गत गुंतवणुकीची लवचिकता :** तुमच्या गुंतवणुकीचे ह्याद्वारे व्यवस्थापन करा:
  – तुमच्या जोखीम पचवण्याच्या क्षमतेनुसार 9 फंड पर्यायांतून निवडीला वाव
  – पॉलिसीच्या मुदतीमध्ये अमर्याद फ्री स्विचेस आणि प्रीमियम री–डायरेक्शन्स&
- पॉलिसीच्या मुदतपूर्तीनंतर **रिटर्न ऑफ मोरटॅलिटी चार्जेस (ROMC)**
- **लॉयल्टी ॲडिशन्स**# द्वारा तुमच्या फंड मूल्याला जोरदार चालना
- **संरक्षण :** दुर्दैवाने मृत्यू झाल्यास तुम्ही आणि तुमच्या जीवलगांसाठी आर्थिक संरक्षण
- **पद्धतशीरपणे मासिक रक्कम काढणे# :** मासिक रकमेतून तुमच्या नेहमीच्या खर्चांची तरतूद
- **कर लाभ** ** : भारतातील लागू प्राप्तिकर कायद्यांच्या अनुसार तुम्ही प्राप्तिकर लाभ/सूट ह्यासाठी पात्र ठरता, जे कायदे वेळोवेळी बदलू शकतात
- **रोखीकरण :** पॉलिसीच्या 5व्या वर्षापासून अंशत: रक्कम काढण्याची सुविधा उपलब्ध

#11व्या पॉलिसी वर्षापासून. सर्व देय प्रीमियम्स भरलेले असणे आणि पॉलिसी कार्यान्वित असणे अध्याहृत
&पॉलिसीच्या दुसऱ्या महिन्यापासून.
**प्राप्तिकर कायद्यांच्या अनुसार कर लाभ, जे कायदे वेळोवेळी बदलू शकतात. तपशीलवार माहितीसाठी कृपया तुमच्या कर सल्लागाराचा सल्ला घ्या.

## लाभांचे नमुना उदाहरण

अजय 30 वर्षांचे आहेत आणि त्यांनी ₹12 लाख बेसिक सम ॲश्युअर्डसह 25 वर्षांच्या पेमेंट मुदतीसाठी एसबीआय लाइफ – स्मार्ट इन्शुअरवेल्थ प्लस पॉलिसी घेतली आहे. ते प्रति महिना ₹10,000 प्रीमियम भरतात. त्यांनी स्मार्ट चॉइस स्ट्रॅटेजी अंतर्गत 100% इक्विटी फंड निवडला आहे. ह्या प्लॅनमध्ये त्यांना कसे लाभ होतात ते पाहूया.


1. **मॅच्युरिटी बेनिफिट (एकरकमी)**
   मुदतपूर्तीच्या तारखेला, अजय ह्यांचा अध्याहृत गुंतवणूक उत्पन्नावर आधारित मॅच्युरिटी बेनिफिट, खाली दिलेल्या तक्त्याच्या अनुसार असेल :




| अध्याहृत गुंतवणूक उत्पन्न | मासिक शुल्काचा परतावा (₹) | एकूण मॅच्युरिटी बेनिफिट (₹) (फंड व्हॅल्यू^) (25व्या वर्षाच्या अखेरीस) |
|---|---|---|
| 8% | ₹ 6,351 | ₹ 68,76,034 |
| 4% | ₹ 7,218 | ₹ 39,50,030 |

**2. डेथ बेनिफिट (एकरकमी)**

अजयचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास 18व्या पॉलिसी वर्षाच्या अखेरीस, अध्याहृत गुंतवणूक उत्पन्नावर आधारित डेथ बेनिफिट खालील तक्त्यानुसार आहे :




| अध्याहृत गुंतवणूक उत्पन्न | डेथ बेनिफिट^ (18व्या पॉलिसी वर्षाच्या अखेरीस) |
|---|---|
| 8% | ₹ 37,52,204 |
| 4% | ₹ 25,59,721 |

^फंड व्हॅल्यूची आकडेवारी ही उदाहरण स्वरुपाची आणि सुदृढ व्यक्तींसाठी आहे. कृपया लक्षात घ्या की वर उल्लेखलेले @4% आणि @8% प्रति वर्ष हे रिटर्न्सचे अध्याहृत दर हे सर्व लागू चार्जेस विचारात घेतल्यानंतर ह्या दरांनी हे केवळ खुलासा करणारे नमुने आहेत. ह्यांची हमी देण्यात येत नाही आणि ते रिटर्न्सची सर्वात अधिक किंवा कमी मर्यादाही नव्हेत. युनिट लिंक्ड लाइफ इन्शुरन्स प्रॉडक्ट्स ही मार्केटच्या जोखमींच्या सापेक्ष आहेत. या करारांर्गत देऊ करण्यात येणारे विविध फंड ही फंडांची नावे असून ती ह्या प्लॅन्सचा दर्जा, त्यांची भावी वाटचाल आणि उत्पन्ने ह्यांचे कोणत्याही प्रकारे निर्देशन करीत नाहीत. अधिक माहितीसाठी कृपया तुमच्या पॉलिसीशी निगडित लाभाचे उदाहरण मागून घ्या.

## प्लॅनचे तपशील

| | | |
|---|---|---|
| **प्रवेशाचे वय$** | **किमान :** 0 वर्षे (30 दिवस) | **कमाल :** 55 वर्षे |
| **मुदतपूर्तीचे वय$** | **किमान :** 18 वर्षे | **कमाल :** 65 वर्षे |
| **पॉलिसीची मुदत$$** | 10, 15, 20 आणि 25 वर्षे | |
| **प्रीमियम भरण्याची मुदत** | पॉलिसीच्या मुदतीएवढीच | |
| **प्रीमियमची रक्कम (₹100च्या पटीत)** | **किमान :** ₹4,000 प्रति महिना | **कमाल :** बोर्ड अनुमतीप्राप्त अंडररायटिंग पॉलिसी असल्यास मर्यादा नाही. |
| **प्रीमियमची वारंवारिता** | मासिक | |
| **बेसिक सम ॲश्युअर्ड** | 10 x वार्षिकीकृत प्रीमियम++<br>कमाल बेसिक सम ॲश्युअर्ड ही बोर्डाने मान्यता दिलेल्या अंडररायटिंग पॉलिसीनुसार असेल. | |

$वयासंबंधीचे सर्व संदर्भ हे मागील वाढदिवसाचे वय आहेत.

$$अल्पवयीनांच्या जीवनाच्या बाबतीत, पॉलिसीची मुदत अशी नेमकेपणे निवडायला हवी की मुदतपूर्तीच्या वेळी जीवन विमा उतरवलेली ती व्यक्ती सज्ञान वयाची असेल. प्रवेशाचे वय 8 वर्षांपेक्षा कमी असणाऱ्या अल्पवयीनांच्या बाबतीत जोखीम 2 पॉलिसी वर्षे पूर्ण केल्यावर सुरू होते. प्रवेशाचे वय 8 वर्षे आणि त्यापेक्षा जास्त असताना जोखीम ताबडतोब सुरू होते.

++वार्षिकीकृत प्रीमियम म्हणजे एका वर्षात लागू असलेले कर वगळता देय असणारी प्रीमियमची रक्कम.

## सवलतीस प्रतिबंध

**वेळोवेळी सुधारणा केलेल्या विमा अधिनियम 1938चे कलम 41 असे नमूद करते की :**

क) भारतातील जीवन वा मालमत्ता ह्यांच्याशी संबंधित कोणत्याही जोखमीच्या संदर्भात विमा घेण्यासाठी वा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी वा तो सुरू ठेवण्यासाठी कुणीही व्यक्ती विमाप्रदात्याद्वारे प्रकाशित केलेल्या माहिती पत्रक किंवा तक्त्यानुसार अनुमती देण्यात असलेली सूट वगळता, तिला देय असलेल्या पूर्ण वा अंशत: कमिशनची कोणतीही सूट कुणाही व्यक्तीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आमिष स्वरूपात देऊ शकत नाही व देण्याची ऑफर दाखवू शकत नाही किंवा पॉलिसी घेणारी वा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरू ठेवणारी कुणीही व्यक्ती कोणतीही सूट स्वीकारूही शकत नाही.

ख) ह्या विभागाच्या तरतुदींची पूर्तता करण्यामध्ये कुणाही व्यक्तीने हयगय केल्यास त्याला/तिला दंड होऊ शकतो, ज्याची रक्कम दहा लाखांपर्यंत विस्तारित होऊ शकते.

**Toll-free No.:** 1800 267 9090 | SMS '**LIBERATE**' to 56161 | **Email:** info@sbilife.co.in | **Web:** www.sbilife.co.in
(Between 9.00 am & 9.00 pm)

एसबीआय लाइफ – स्मार्ट इन्शुअरवेल्थ प्लस एक इंडिविज्युअल, युनिट-लिंक्ड, नॉन-पार्टिसिपेटिंग लाइफ इन्शुरन्स प्रॉडक्ट आहे.

**बनावट फोन कॉल्स आणि खोट्यानाट्या/फसव्या ऑफर्सपासून सावधान :**
विमा पॉलिसींची विक्री, बोनसची घोषणा किंवा प्रीमियमची गुंतवणूक यासारख्या उपक्रमांमध्ये IRDAI सहभागी नाही. ज्या लोकांना अशा प्रकारचे फोन कॉल्स येतील त्यांना पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची विनंती करण्यात येते.

पॉलिसीच्या पहिल्या 5 वर्षांतील सरेंडर प्रकरणी, फंड व्हॅल्यू ही 6व्या पॉलिसी वर्षाच्या कामाच्या 1ल्या दिवशी देय राहील. पॉलिसीच्या 5 वर्षांनंतरच्या प्रकरणी, फंड व्हॅल्यू तात्काळ चुकती केली जाईल. 'प्रीमियम ॲलोकेशन चार्जेस', 'फंड मॅनेजमेंट चार्जेस' असे विविध चार्जेस कापून घेतलेले आहेत. चार्जेस आणि त्यांचे कामकाज, ह्यांच्या संपूर्ण माहितीसाठी कृपया सेल्स ब्रोशर वाचा. युनिट लिंक्ड लाइफ इन्शुरन्स उत्पादने ही पारंपरिक इन्शुरन्स उत्पादनांपेक्षा वेगळी आहेत आणि त्यांच्यात मार्केट जोखीम असते. भांडवली बाजारातील गुंतवणुकींमधील जोखमींचा परिणाम युनिट लिंक्ड पॉलिसीमध्ये भरलेल्या प्रीमियमवर होऊ शकतो आणि फंडाची कामगिरी व भांडवली बाजारावर परिणाम करणाऱ्या घटकांच्या आधारावर युनिट्सची एनएव्ही वर किंवा खाली जाऊ शकते आणि पॉलिसीधारक/विमा उतरणारी व्यक्ती त्याच्या/तिच्या निर्णयांसाठी जबाबदार राहील. एसबीआय लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड हे इन्शुरन्स कंपनीचे फक्त नाव आहे आणि एसबीआय लाइफ – स्मार्ट इन्शुअरवेल्थ प्लस हे युनिट लिंक्ड लाइफ इन्शुरन्सचे फक्त नाव असून उत्पादनांचा दर्जा, त्यांचे भवितव्य किंवा उत्पन्न याबाबत कोणतेही निर्देश देत नाही. तुमच्या इन्शुरन्स ॲडवायझरकडून किंवा मध्यस्थाकडून किंवा विमाकाराच्या पॉलिसी डॉक्युमेंटमधून संबंधित जोखीम आणि लागू असलेले आकार यांची माहिती करून घ्या. या करारांतर्गत देऊ करण्यात येणारे विविध फंड ही फंडांची नावे असून ती ह्या प्लॅन्सचा दर्जा, त्यांचे भवितव्य आणि उत्पन्न याबाबत कोणतेही निर्देश देत नाही. फंड ऑप्शन्सची गतकालीन कामगिरी ही भावी कामगिरीची निर्देशक नाही. ह्या पॉलिसीच्या अंतर्गत देय असणारे सर्व लाभ हे कर कायद्यांच्या आणि अन्य वेळोवेळी करण्यात येणाऱ्या अन्य कायद्यांच्या सापेक्ष आहेत, तपशीलांसाठी तुमच्या टॅक्स ॲडवायझरबरोबर सल्लामसलत करा. विक्री व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी जोखमीचे घटक, अटी आणि शर्ती ह्यांच्या अधिक तपशीलांसाठी कृपया विक्री माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचा. वर प्रदर्शित ट्रेड लोगो स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मालकीचा आहे व परवान्याअंतर्गत एसबीआय लाइफद्वारे वापरला गेला आहे. एसबीआय लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय : नटराज, एम. व्ही. रोड आणि वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जंक्शन, अंधेरी (पूर्व), मुंबई-400 069. **IRDAI रजिस्ट्रेशन नं. 111** | CIN : L99999MH2000PLC129113. NW/2J/ver1/01/22/SP/MAR